**विशेष लेख क्र. २६** ४ वैशाख १९३० शके (सायं. ५.३० वा.)
**१ मे-महाराष्ट्र दिन** गुरुवार, दि. २४ एप्रिल २००८

# जय महाराष्ट्र

संयुक्त महाराष्ट्राचा लढा म्हणजे जणू एक धगधगते यज्ञकुंडच! या लढ्यात प्रतिभावंत लेखक, राजनेते, पत्रकार, विचारवंत यांनी सहभाग घेतला, मराठी भाषिक प्रदेश एकत्र आणण्याची कल्पना उभयंतांनी शासनापुढे मांडली आणि बलशाली असा संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा, यासाठी सर्वशक्तीनिशी प्रयत्न केले. आंदोलने केली, कारावास भोगला, तर काहींना पोलिसांचा अमानुष लाठीहल्ल्याला सामोरे जावे लागले. इतकेच नव्हे तर या विधायक कार्याच्या पुर्तीसाठी काहींनी तर आपल्या प्राणाची आहुती दिली. एक दोन नव्हे तर, नवराज्याच्या निर्मितीसाठी १०६ हुतात्म्यांनी आपले बलिदान दिले. १ मे १९६० रोजी तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते नवनिर्मित महाराष्ट्र राज्याचे उद्‌घाटन मोठ्या थाटात संपन्न झाले आणि संयुक्त महाराष्ट्र स्थापनेचे स्वप्न अखेर साकारले.

## सोनियाचा दिवस

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांनी संयुक्त महाराष्ट्र स्थापनेच्या **१ मे** या दिवसाबद्दल **सोनियाचा दिवस** असे गौरवोद्‌गार काढले होते. तत्कालिन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते १ मे १९६० रोजी राजभवन येथे संयुक्त महाराष्ट्र राज्याचे उद्‌घाटन झाले. त्याप्रसंगी बोलताना यशवंतराव म्हणाले “नवमहाराष्ट्र राज्याच्या जन्माने आपल्याला भरभराटीचे व सुखाचे दिवस येतील. जनतेची अपेक्षापूर्ती करणे, हा महाराष्ट्र राज्याचा मी मानबिंदू मानतो. महाराष्ट्राच्या भवितव्याची ही लांबच-लांब सफर आहे. त्यातील आम्ही सर्व प्रवासी आहोत. ही सफर तुम्हां-आम्हाला कुठल्याही परिस्थितीत पुरी करावयाची आहे, कारण त्यात जनतेचं कल्याण सामावलेलं आहे. कारण मराठी भाषिक प्रदेश एकत्र करुन जनताभिमुख सरकार देणे, हे महाराष्ट्र राज्य स्थापनेमागील मुख्य धोरण आहे, हे सर्वांनी आपल्या मनावर कोरुन ठेवावे”

## महाराष्ट्रात राहणारा तो महाराष्ट्रीय

१ मे १९६० हा स्वप्नपूर्तीचा दिवस! यशवंतराव चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली पहिल्या मंत्रिमंडळाने नवराज्याचा राज्यकाभार हाती घेतला. नव महाराष्ट्राची धुरा हाती घेताना ते म्हणाले "लोक कोणत्या भागात राहात आहेत, त्यांची भाषा काय, त्यांचा धर्म कोणता, या विचाराला यत्किंचितही थारा न देता, सर्व वर्ग व जातीच्या लोकांना समान न्याय व समान संधी प्राप्त करुन देणं, ही सरकारची भूमिका राहील. महाराष्ट्रीय माणूस हा केवळ मराठी भाषा बोलणारा नव्हे, तर जो महाराष्ट्रात राहतो व आपल्या शक्तीच्या जोरावर आपले जीवन समृद्ध करतो, असा प्रत्येक माणूस हा महाराष्ट्रीय आहे". खऱ्या अर्थाने महाराष्ट्र हे सर्वधर्मसमभावाचे प्रतिक आहे.

## महाराष्ट्र प्राणापेक्षा प्रिय

आपला महाराष्ट्र हा प्राणापेक्षाही प्रिय आहे, हे शब्दबद्ध करताना कविवर्य श्री.कृ.कोल्हटकर आपल्या कवितेत म्हणतात **“बहु असोत सुंदर संपन्न महा, प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा !”** महाराष्ट हे सर्व दृष्टीने गुणसंपन्न आहे. महाराष्ट्राबद्दलच्या गौरवपर कवितेत कवि कुसुमाग्रज उत्कट शब्दात सांगतात, “माझ्या मराठी मातीचा लावा ललाटासी टिळा, तिच्या संगे जागतील मायदेशातील शिळा” आणि दुसऱ्या कवितेत ते म्हणतात, “हे शिवसुंदर समशालिनी महाराष्ट्र माऊली, युगायुगांची जीवनगंगा उदे तुझ्या कपाळी ”

..२/-

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर मराठीला राजभाषेचा दर्जा मिळाला. मायमराठीचा गौरव करताना कविवर्य सुरेश भट म्हणतात, ''लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी ! धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी, एवढया जगात माय मानतो मराठी'' नव महाराष्ट्राची मुहुर्तमेढ  झाल्यावर अनेक कविंनी महाराष्ट्र व मराठी भाषेवर गौरवपूर्ण शब्दात स्तुतीसुमने वाहिली. मऱ्हाठमोळया महाराष्ट्राबद्दल अस्सीम प्रेम व जाज्वल्य अभिमानाचं प्रतिबिंब या महान कविवर्यांच्या काव्यातून प्रकट होते.

**काहींचे बलिदान तर काहींचे योगदान**

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी तीव्र आंदोलन छेडले असता आंदोलकांवर तत्कालिन मोरारजी देसाई सरकारच्या पोलिसांनी बेछूट गोळीबार केला. त्यात एकूण १०६ जणांनी हौतात्म्य पत्करले. संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती म्हणजे हुतात्म्यांच्या बलिदानाची फलश्रृती, असे म्हणणंच संयुक्तिक ठरेल. मराठी भाषिक प्रदेश एकसंध करुन संयुक्त महाराष्ट्र स्थापन करण्यासाठी एक व्यासपीठ असावे, यासाठी संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, सेनापती बापट, प्रबोधनकार ठाकरे, नाना पाटील, तुळशीदास जाधव, डॉ. धनंजयराव गाडगीळ, भाऊसाहेब हिरे, नानासाहेब कुंटे, आचार्य अत्रे, कॉ.मिरजकर, प्रा, मधु दंडवते, के.एल.देसाई, कृष्णा देसाई, रसिक भट, एस.जी.पाटकर, लालजी पेंडसे, सरदेसाई, जोगळेकर, गुलाबराव गणाचार्य, केशवराव जेधे, दा.वि.गोखले, य.कृ. सोवनी, कॉ. डांगे, अनुताई लिमये अशा अनेक प्रभृतींनी संयुक्त महाराष्ट्र निर्मितीत मोलाचे योगदान दिले. या महनीय व्यक्तिंचे आम्ही सदैव ऋणी राहू.

**समृद्ध व प्रगत महाराष्ट्र**

हुतात्म्यांच्या रक्ताच्या आहुतीने निर्माण झालेल्या नव महाराष्ट्राला 'सुजलाम-सुफलाम' करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. राज्यातील गोरगरीब, उपेक्षित आणि मागासवर्गीयांच्या विकासाला अग्रक्रम देऊन शासनाने सामाजिक न्यायाचा एक नवा अध्याय सुरु केला आहे. कृषी, उद्योग व माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रात महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य म्हणून गणले जात आहे. इतकेच नव्हे तर सुशिक्षित बेरोजगार, कामगार, शेतमजूर, घरकामगार यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने अनेकविध योजना राबविल्या आहेत. फुले-शाहू-आंबेडकरांच्या पुरोगामी विचारांची परंपरा लाभलेल्या महाराष्ट्राला देशात सर्व आघाड्यांवर अग्रभागी ठेवण्यासाठी शासन शर्तीचे प्रयत्न करीत आहे. हुतात्म्यांच्या बलिदानाने साकारलेल्या महाराष्ट्राला अधिक प्रगत व समृद्ध करण्यासाठी चला, तर आपण सर्वजण कटिबद्ध होऊया!

महाराष्ट्र चिरायु होवो ! जय महाराष्ट्र !

**-रणवीर रजपूत**
**वरिष्ठ सहाय्यक संचालक, मंत्रालय**

० ० ०